# निवडणूक अधिसूचना
## नागपूर कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर तह.जि. नागपूर

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी–विक्री (विकास व विनियमन) अधिनियम 1963 व त्याअंतर्गत चे नियम 1967 चे नियम 43 नूसार मी सौरभ राव, जिल्हाधिकारी नागपूर, कृषी उत्पन्न बाजार समिती नागपूर, तह.जि. नागपूर या निवडणूकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

निवडणूक कार्यक्रम 2011–12

| मतदार संघाचे नांव | नामनिर्देशनपत्र सादर करण्याची शेवटची तारीख, ठिकाण व वेळ आणि नामदनिर्देशन पत्र मिळु शकेल ती जागा | प्राप्त झालेली नामनिर्देशनपत्र प्रसिध्द करण्याची तारीख | नामनिर्देशन पत्राच्या छाननीसाठी तारीख वेळ व जागा | विधिमान्य नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्द करण्याची तारीख | अपील दाखल झाले असल्यास विधीमान्य नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्द करण्यासाठी तारीख | ज्या तारखेपर्यत नामनिर्देशन पत्र मागे घेता येईल ती तारीख व वेळ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्याची तारीख | आवश्यक असल्यास मतदान ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख व वेळ | मतमोजणीची तारीख, वेळ व स्थळ | मतदानाचा निकाल घोषित करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 12 |
| महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 चे कलम 13(1) नूसार मतदार संघ व निवडून द्यावयाच्या समिती सदस्याची संख्या / जागा | गुरुवार<br>दि. 05.01.2012 सकाळी 11.00 ते 3.00 वाजेपर्यत (सार्वजनिक सुटीचे दिवस वगळुन)<br>स्थळ<br>निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन (कान्होली नाला प्रकल्प) नागपूर तहसिल कार्यालय नागपूर (शहर) बिल्डींग (पहिला माळा) खोली क्रमांक 22 | जशी जशी नामनिर्देशन पत्र प्राप्त होतील त्या प्रमाणे नामनिर्देशन पत्राच्या अंतिम तारखेपर्यत दुपारी 3.00 वाजेपर्यंत | सोमवार<br>दि. 08.01.2012<br>सकाळी 11.00 वाजता<br>स्थळ<br>निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन (कान्होली नाला प्रकल्प) नागपूर तहसिल कार्यालय नागपूर (शहर) बिल्डींग (पहिला माळा) खोली क्रमांक 22 | बुधवार<br>दि. 11.01.2012<br>सकाळी 11.00 वाजता<br>स्थळ<br>निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन (कान्होली नाला प्रकल्प) नागपूर तहसिल कार्यालय नागपूर (शहर) बिल्डींग (पहिला माळा) खोली क्रमांक 22 | बुधवार<br>दि. 25.01.2012<br>दुपारी 3.00 वाजता<br>स्थळ<br>निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन (कान्होली नाला प्रकल्प) नागपूर तहसिल कार्यालय नागपूर (शहर) बिल्डींग (पहिला माळा) खोली क्रमांक 22 | शनिवार<br>दि. 28.01.2012<br>दुपारी 3.00 वाजेपर्यत<br>स्थळ<br>निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन (कान्होली नाला प्रकल्प) नागपूर तहसिल कार्यालय नागपूर (शहर) बिल्डींग (पहिला माळा) खोली क्रमांक 22 | सोमवार<br>दि. 30.1.2012<br>चिन्ह वाटपानंतर | मंगळवार<br>दि. 14.02.2012<br>सकाळी 8.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत<br>मतदान केन्द्र निवडणूक निर्णय अधिकारी ठरवतील त्यानूसार | बुधवार<br>दि. 15.02.2012<br>सकाळी 10.00 वाजेपासून<br>मतमोजणीचे ठिकाण निवडणूक निर्णय अधिकारी ठरवतील त्यानूसार | मतमोजणी संपल्यानंतर लगेच |

| अ.क्रं. | मतदार संघाचे नांव | जागा |
|---|---|---|
| 1 | सेवा सहकारी संस्था मतदार संघ (11) | – |
| | अ) सर्वसाधारण | 7 |
| | ब) महिला | 2 |
| | क) इतर मागासवर्गीय | 1 |
| | ड) विमुक्त जाती / भटक्या जमाती | 1 |
| 2 | ग्राम पंचायत मतदार संघ (4) | – |
| | अ) सर्वसाधारण | 2 |
| | ब) अनुसूचित जाती / जमाती | 1 |
| | क) आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | 1 |
| 3 | व्यापारी व अडते मतदार संघ | 2 |
| | अ) हमाल, व्यापारी व तोलारी मतदार संघ | 1 |
| | ब) पणन प्रक्रिया सहकारी संस्था मतदार संघ | 1 |
| | एकुण निवडून द्यावयाच्या समिती सदस्याची संख्या | 19 |

टिप :–

1) नामनिर्देशन पत्र दि. 22.12.2011 पासुन श्री आर. पी. जोशी, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन (कान्होली नाला प्रकल्प) नागपूर तहसिल कार्यालय नागपूर (शहर) बिल्डींग (पहिला माळा) खोली क्रमांक 22 नागपूर यांचे कार्यालयात पुरविण्यात व स्विकारण्यात येईल.

2) उमेदवारी अर्ज रु. 50 / – (अक्षरी रु. पन्नास फक्त) भरुन उपजिल्हाधिकारी , भुसपांदन (कान्होली नाला प्रकल्प) नागपूर याचे कार्यालयातून मिळेल.

3) उमेदवारी अर्जासोबत निवडणूक अनामत रक्कम रु. 100 / – (अक्षरी रुपये शंभर फक्त) जमा करण्यात यावे.

4) कलम 13 (1) अ (2) मधील जागेसाठी फॉर्म भरतांना तो अधिनियमाचा कलम 2 पोटकलम (1) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शेतकरी असल्याबाबत व बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात राहात असल्याबाबत तलाठी, सरपंच अथवा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाच्या गट सचिवाचे प्रमाणपत्र उमेदवारी अर्जासोबत जोडावे.

5) अनुसूचित जाती / जमाती / विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती / इतर मागासवर्गीय व आर्थिक दुर्बल घटक वगैरे राखीव जागांसाठी उमेदवारी अर्ज भरंताना सक्षम प्राधिकाऱ्यांचे जात किंवा उत्पन्नाचे प्रमाणपत्र उमेदवारी अर्जासोबत जोडण्यात यावे.

6) नामनिर्देशन पत्राबाबत नियम 51 प्रमाणे अपील करावयाचे असल्यास अपील कर्त्यानी त्यांचे अपील जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कडे दि. 17.01.2012 पर्यंत दुपारी 3.00 वाजेच्या अगोदर दाखल करावे.

7) उमेदवारांना चिन्हे वाटप दिनांक 28.01.2012 रोजी दुपारी 3.00 वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात देण्यात येईल.

8) महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) 1967 चे नियम 41–सी नुसार निवडणूक निर्णय अधिकारी मतदान केन्द्राचा तपशील व मतमोजणीचे ठिकाण नंतर जाहीर करतील.

9) कार्यक्रम प्रसिध्द झाल्याचे दिवशी उमेदवाराचे वय 21 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

10) कलम 13 (1) अ (II) नूसार निवडून द्यावयाच्या आर्थिक दुर्बल घटक उमेदवारांसाठी दुर्बल घटकांची व्याख्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73 (ब) अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचने नूसार राहील.

11) निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री आर. पी. जोशी, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन (कान्होली नाला प्रकल्प) नागपूर यांची नेमणूक करण्यात आली.

12) या निवडणूकीसबंधीची अंतिम मतदार यादी (मतदार संघ निहाय) जिल्हाधिकारी कार्यालय (निवडणूक शाखा) नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य कार्यालयात, खंड विकास अधिकारी, नागपूर यांचे कार्यालयात तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर तहसिलदार, तहसिल कार्यालय नागपूर (ग्रामीण), सहाय्यक निबंधक, सह. संस्था नागपूर (ग्रा) यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

13) निवडणूकीची संपूर्ण कार्यवाही महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 व त्याखालील नियम 1967 अन्वये नागपूर कृषी उत्पन्न बाजार समिती, तह.जि. नागपूर ची उपविधी व वेळोवेळीचे शासन / पणन संचालक यांचेकडील आदेश तथा परिपत्रकीय सूचना यातील तरतूदीनूसार पार पाडण्यात येईल.

14) वरिल कार्यक्रमात कोणताही आवश्यक बदल करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकाराचे स्वाधीन असेल.

ठिकाण :– नागपूर

दिनांक 22.12.2011

(सौरभ राव)

जिल्हाधिकारी, नागपूर